# चुलीपल्याड...

अंक ११ वा – डिसेंबर २०१८

**सप्रेम नमस्कार,**

२०१८ साल संपत असताना हा अंक तयार होतोय. या वर्षभरात अनेक बऱ्या–वाईट घटना, घडामोडी घडल्या आहेत. इथे मात्र मी या अंकातल्या काही लेखांनिमित्तानं बोलणार आहे.

आपण आपल्या बैठकांमध्ये मासिकपाळीबद्दल बोलतो. पाळीविषयीची शास्त्रीय माहिती असणं महत्त्वाचं आणि आवश्यक असतंच, ती मिळाली तर त्याच्या भोवतीचे सगळे गैरसमज दूर होतील आणि मग त्याभोवती रचलेल्या प्रथा परंपराही आपोआप बंद होतील असा आपला एक तार्किक समज असतो. पण प्रथा चालूच राहतात. शबरीमलाच्या घटनेनंतर हे पुन्हा एकदा लख्खपणे जाणवलं – स्त्रियांना अपवित्र मानणारी, कमी लेखणारी ही डोक्यातली जळमटं काढणं किती अवघड आहे! महिलांना मंदिर – प्रवेश खुला करणाऱ्या निर्णयाचं स्वागत होण्याऐवजी, भाजप आणि त्याच्या मित्र संघटनांनी रस्त्यावर उतरून या निर्णयाविरोधात धुमाकूळ घातला. म्हणून याबद्दलची मतं आम्ही जाणून घेतली. 'देहीचा विटाळ देहीच जन्मला: सोवळा तो झाला कवण धर्म? विटाळावाचून उत्पत्तीचे स्थान, कोण देह निर्माण, नाही जगी?' संत सोयराबाईंनी विचारलेला हा प्रश्नच आमच्या अनेक मैत्रिणींनी शबरीमलाबाबत विचारलेला आहे. घटनेनं दिलेल्या समानतेच्या हक्कांचीही जाणीव करून दिलेली आहे.

दुसऱ्या बाजूला, विज्ञानाचाच उपयोग पाळीविषयीच्या पारंपरिक कल्पना बळकट करण्यासाठीच केला गेला. आणि पाळी पुढं ढकलण्यासाठी गोळ्या निघाल्या. सणवार असले की अगदी सररास आणि सहजपणे बायका या गोळ्या घेतात! मला प्रश्न पडतोय तो हा की अजून किती काळ आपण मासिक पाळीवर तेच तेच बोलत राहणार आहोत?


आज अल्पसंख्याक समाजाला विशेषत: मुसलमानांना असुरक्षित वाटेल, भय वाटेल असं वातावरण आहे. पण त्याचवेळी परस्परांमधला भाईचारा, प्रेम दाखवणारे अनुभवही आहेत, ते दृढ करण्याची त्यांना घेऊन समाज म्हणून पुढं जाण्याची गरज आहे. गायीचं हिन्दूकरण करून पुन्हा याच समाजाला हिंसेचं लक्ष्य केलं जातंय. पण वास्तव वेगळं आहे, ते उघड्या डोळ्यांनी आणि पूर्वग्रहविरहित मनानं समजावून घेऊया. शांततामय सहजीवन असेल तरच देशाची, समाजाची प्रगती होते, हे आपण कधीही विसरता कामा नये. याच नववर्षाच्या शुभेच्छा!

आपली,
**वंदना**

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १. | सलोख्याचं गाव | २ |
| २. | ग्रहण सुटले... | ४ |
| ३. | बिकट वाट वहिवाट बनावी | ५ |
| ४. | प्रश्नांना भिडण्याची हीची न्यारीच रीत | ९ |
| ५. | हमारे मन की बात... | १० |
| ६. | फक्त 'शिडी'ची आठवण ठेवा | १४ |
| ७. | माझ्या मनाचा दुखावलेला कोपरा | १६ |
| ८. | पाळी मिळी गुपचिळी | १७ |
| ९. | जीवन कौशल्य कार्यशाळा | १८ |
| १०. | गुन्हा कुनाचा? आन दंड कुनाला? | १८ |
| ११. | बालमेळावा | १९ |

# सलोख्याचं गाव



ही गोष्ट आहे आटपाटनगरीची. फार फार पूर्वीची तर नाहीच, तर अगदी अलीकडची. आणि गोष्ट आहे अगदी खरी, प्रत्यक्षात घडलेली. या आटपाटनगरीचं नाव आहे वडगाव मावळ. गोष्ट म्हटली तर अगदी साधी, पण आजच्या काळासाठी म्हटली तर एकदम विशेष. ते कसं कसं झालं हेही सांगते.

सप्टेंबर महिना. सगळीकडे गणपती उत्सवाचं वातावरण. दिशाच्या गीताताईंचा फोन आला. आवाजात उत्साह आणि आनंद ओसंडून वाहात होता. ती सांगत होती, ''गणपती बसले त्या काळात मी शकिलाभाभींकडे वडगावला गेले होते. तिथे ताबूतही होता आणि गणपती मंडळाचा गणपतीचा देखावाही. अगदी शेजारी, लागून आणि त्याच्याच मागे जैन मंदिरात प्रार्थना चालू होती. मला हे वेगळं आणि छान वाटलं. मी याबद्दल भाभींशी बोलले. भाभींनी हे कसं कसं झालं ते सांगितलं. खूप भारी वाटलं. म्हणून लग्गेच तुला फोन केला. आपण आपल्या मिटिंगमध्ये सत्कार करायचा का भाभींचा याबद्दल?'' ऐकताना माझ्याही अंगावर रोमांच उभे राहिले होते. गीताचा आनंद माझ्याही रोमारोमात पसरला होता. भाभींना अनुभव–कथन करायला सांगून त्यांचा सत्कार करायची गीताची कल्पना छानच होती. त्या दिशाच्या पतसंस्थेच्या पदाधिकारी, बचतगटाच्या जुन्या क्रियाशील सदस्य त्यामुळे ते सहज शक्य होतं आणि आवश्यकही. त्यातूनच कल्पना सुचली की तीनही धर्माच्या कार्यकर्त्यांना बोलवावं, त्यांनी घेतलेल्या सामंजस्याच्या भूमिकेची दखल घेऊन त्याबद्दल जाहीर आनंद व्यक्त करावा, यामागची प्रक्रिया आणि अनुभव त्यांना मांडायला सांगावेत. त्याप्रमाणे या तीनही संस्थांच्या मंडळींना आमंत्रण दिलं . त्यांनीही यायचं आनंदानं मान्य केलं. आम्ही या दिवसाची आतुरतेनं वाट पहात होतो, तो या कार्यक्रमाचा दिवस उजाडला.

आम्ही पोचलो तेव्हा दिशाचा सगळा स्टाफ, गाव पातळीवर काम करणारे कार्यकर्ते, लिंक वर्कर्स एकत्र जमले होते. गीतानं मंडळाचे कार्यकर्ते आणि जैन संघटनेचे कार्यकर्ते येऊ शकत नसल्याचं सांगितल्यानं काहीसा विरस झाला. परंतु सहकार्याला तत्पर असणाऱ्या शकिला भाभी, आणि नेहमीच त्यांना आश्वासक साथ देणारे त्यांचे पती रशीद शेख चाचा, त्यांचे सहकारी बादशाह शेख, आणि मशिदीचे मौलाना मजबूर रहेमान दाखल झाले.

गीताने या कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगितली. आणि सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर शेखचाचांनी आणि मौलानांनी वडगावला असणारा विविध धर्मियांमधल्या सलोख्याचा इतिहासही मांडला : गणपती आणि मोहोरम – ताबूत साधारणत: १२ वर्षांनी एकत्र येतात, तसे ते यावर्षी एकत्र आले होते. बाजारात ताबुताची जागा आहे. गेली २८ वर्षं त्या जागी ताबूत बसत होता. तिथेच यंदा गणपतीचा देखावा उभा करण्यात आला होता. गणपती आणि ताबूत एकाच वेळी आलेले असताना हे कसं घडलं? तेही शांततेत? खरं तर ही जागा ताबुताची हक्काची. त्यामुळे पोलीसही त्यांच्या बाजूने होते. 'परंतु आमचा काही गणपतीसारखा मोठा देखावा नसतो. त्यामुळे मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी आम्ही सर्वांनी बाजूला व्हायचं ठरवलं. आणि ती जागा मंडळाला देखावा उभारण्यासाठी दिली. गेली २८ वर्षं जिथं ताबूत बसतो तिथे पहिल्यांदा गणपती बसवण्यात आला. ही भूमिका घेतली नसती तर भांडणं झाली असती, ठिणगी पडायला कितीसा वेळ लागतो? मंडळाच्या मुलांनीही छान साथ दिली. एकाच माईकवर गणपतीची आरती आणि ताबुताचे कार्यक्रम व्हायचे. दोन्ही

धर्माची मुलं दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमांना जायची.' चाचांनी आणि त्यांच्या या सहकाऱ्यांनी घेतलेली सामंजस्याची ही भूमिका अत्यंत मोलाची होती.

''चार वर्षांपूर्वी बकरी ईद आणि महावीर जयंती एकत्र आली होती. जैन धर्मगुरूंनी मौलानांना बोकड न कापण्याची विनंती केली. मौलानांनी ती मानली. त्याप्रमाणे मशिदीत जमलेल्या भाविकांना सांगितले, कोणीही त्यादिवशी बोकड कापले नाही. हे या वडगावचं वैशिष्ट्य आहे. वडगावचं पाणीच काही वेगळं आहे.'' (हे सांगताना चाचांचा सूर अभिमानानं भरून आलेला होता.) वडगावमध्ये पोटोबा गणपतीचं मंदीर आणि मशीदही शेजारीशेजारी लागून आहेत. रोजची आजान झाल्यावरच देवळात आरतीला सुरवात होते. ताबुताच्या मिरवणुकीतही बहुसंख्येनं हिंदू बायका सहभागी होतात. भाभींचा बांगड्यांचा व्यवसाय आहे. या भागात कोणतंही मोठं लग्न असलं की भाभींनाच बोलावतात. त्यांच्याकडूनच नवरीला बांगड्या भरतात.

क्वचित कधी अफवेच्या आधारे मशिदीवर, मुसलमानांच्या दुकानांवर दगडफेक करून मोडतोड करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा असं करणारी मुलं माहिती असूनही त्यांची नावं त्यांनी पोलिसांना सांगितली नाहीत, भावनेच्या भरात मुलं चुकीचं वागली पण जेलमध्ये गेली तर सगळं आयुष्य बरबाद होईल पोरांचं हा विचार करून.

चाचांना शिवाजी महाराजांविषयी प्रचंड आदर आणि प्रेम आहे. 'शिवाजी रयतेचा राजा होता. महाराजांनी जातीजातीत, धर्माधर्मात कधीच भेद केला नाही. त्यांच्या पदरी कितीतरी मुसलमान सैनिक होते, अत्यंत विश्वासू सैनिक होते, स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता त्यांनी महाराजांचं रक्षण केलं. धार्मिक ऐक्य जपणारा शिवाजी महाराजांसारखा राजाच झालेला नाही. पण आज त्याच महाराजांच्या नावावर धर्माधर्मात द्वेष निर्माण केला जातोय, त्यांना महाराज समजलेच नाहीत,' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

शिल्पाने त्यांच्या गाय-प्रकल्पातले अनुभव मांडले. मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात या व्यवसायात आहे आणि अतिशय उत्तम प्रकारे ते गायी सांभाळतात. हे वास्तव असताना अफवा, खोटा प्रचार या आधारे द्वेष पसरवून निरपराध मुस्लिमांचे बळी घेतले जात आहेत. किती लाजिरवाण्या आणि संतापजनक घटना आहेत या. शरमेनं मान खाली जावी. (शिल्पाचा गाय प्रकल्पावरचा स्वतंत्र लेख या अंकात आहे, तो जरूर वाचावा.) मुस्लीम महिलांबरोबर शिल्पाने अनेक वर्षं काम केलेलं आहे, त्यांना सन्मानाची वागणूक मिळावी, सुरक्षित आयुष्य जगता यावं यासाठी काम केलंय, दंगलीच्या काळात त्यांना उभं रहाण्यासाठी मदत केलेली आहे. या कामातून किती माणसं जोडली गेली, जीवाभावाचे संबंध निर्माण झाले याचे हृद्य अनुभव तिने मांडले. जातीधर्माच्या पलीकडे निर्माण झालेल्या माणुसकीच्या नात्याचे अनुभव ऐकताना मन भरून येत होतं.



सत्कार स्वीकारताना - रशीदचाचा शेख, शकिलाभाभी व मौलाना मजबूर रहेमान

आजूबाजूला मन उद्विग्न करणाऱ्या घटना घडताहेत. अल्पसंख्याक समाजानं सतत असुरक्षिततेत, भयाच्या कोषात जगावं असं वातावरण निर्माण केलं जातंय. त्यासाठी लोकांना भडकवण्याचं, एकमेकांविषयीचा द्वेष पेरण्याचं काम सातत्यानं केलं जातंय. फेसबुक, व्होट्स ॲप सारख्या माध्यमांचा उपयोग त्यासाठी केला जातोय. अशा परिस्थितीत त्याला बळी न पडता, जबाबदारीनं वागून समाजामधलं सामंजस्य, सलोखा, प्रेम याची ज्योत तेवती ठेवणं ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. वडगाव मावळचं हे आदर्श उदाहरण आपल्या सर्वांच्या समोर आहेच.

**वंदना कुलकर्णी,**

(ध्वनिमुद्रणाचे प्रतिलेखन - स्नेहल ठक्कर, आलोचना, पुणे)

चित्र - समीधा म्हात्रे, के. पी. सशी; छायाचित्र - प्रविण भोईरकर

# ग्रहण सुटले...

ग्रहणाबाबत आमच्याकडे अनेक समज गैरसमज आहे. काहीजण म्हणतात. ग्रहण लागले म्हणजे सुतक लागले. कोणीही कोणतेच काम करायचे नाही. अन्न खायचे नाही, फक्त बसून राहायचे. यातलाच मी अनुभवलेला ग्रहणाचा प्रसंग.

मी पाच महिन्याची गरोदर असताना खग्रास सूर्यग्रहण आले. आता तर दोन दिवस आधीपासूनच घरातील मंड्ळींनी, शेजारी राहणाऱ्या लोकांनी सूचना द्यायला सुरवात केली. 'कामाला जाऊ नकोस, सुट्टी घे. ग्रहणामध्ये काहीच करायचे नसते. भाजी पण चिरायची नाही. आणि तू जर काम केले तर जन्माला येणाऱ्या बाळावर वाईट परिणाम होतील.' हे सर्व ऐकून घेणे माझ्यासाठी खरंच अवघड होते. आणि या दिलेल्या सूचनांचा रागही येत होता. माझ्या मते ग्रहण म्हणजे अवकाशात घडणाऱ्या प्रकाश सावलीचा आणि खगोलांच्या सापेक्ष स्थानांचा खेळ. पण हे सर्व घरातील लोकांना पटवून सांगायचे तरी कसे? ग्रहणाच्या दिवशी सकाळपासूनच सूचना द्यायला सुरुवात झाली. सासूबाईंचे एकच 'आज ग्रहण आहे, सुट्टी घेऊन घरीच रहा. सकाळीच वेध सुरू होतात, देवाचे नामस्मरण करत बसून रहा. बाकीचे काही काम करू नकोस.'

या गैरसमजुती मनाला पटत नव्हत्या. पण बोलायचे तरी कसे आणि कोणाजवळ? मिस्टरांशी बोलावे तर आई मुलाच्या नात्यात उगाच भांडण लागेल. दुसरे कोणीही जवळची व्यक्ती नव्हती की मी तिला सांगू शकेल.

पण शेवटी धीर करून मिस्टरांशी बोलण्याचा निर्णय घेतला. मिस्टरही आधुनिक विचारांचे, सुशिक्षित असल्यामुळे त्यांनी माझे बोलणे शांतपणाने ऐकून घेतले. आणि या बाबत मी आईशी बोलतो असेही सांगितले. त्यांनी आईशी बोलणे केले. पण मुलाचे बोलणे काही केल्या आईला पटत नव्हते. आईचे आपले एकच – आपल्या घरात येणाऱ्या बाळावर वाईट परिणाम होतील, बाळाला काहीही होऊ शकते. 'तू माझे न ऐकता बायकोचे ऐकतो' म्हणून रागही आला. पण त्या रागाला न जुमानता आम्ही दोघांनी स्पष्टपणे सांगितले की 'काही झाले तरी मी दिवसभर बसून राहणार नाही. बाळ अगदी व्यंग, कुरूप जन्माला आले तरी चालेल, त्याला सांभाळण्याची जबाबदारी आम्हा दोघांची' असे म्हणून मी त्यादिवशीची सगळी कामे केली.

पण सासूबाईंच्या मनातील राग हा दिवसेंदिवस त्यांच्या वागणातून, बोलण्यातून दिसून येत होता. पण मिस्टरांनी त्या नऊ महिन्यात माझी खूप काळजी घेतली. खंबीरपणे माझ्यापाठीशी उभे राहिले.

शेवटी एकदाचा डिलीव्हरीचा दिवस उजाडला. सासूबाई काही दवाखान्यात माझ्या बरोबर येण्यासाठी तयार नव्हत्या. त्यांचे असे म्हणणे होते की 'तुम्ही दोघा नवरा बायकोंनी आत्ता पर्यंत निर्णय घेतले आहेत. आता हे बाळंतपण देखील दोघांनी निस्तरा.' शेवटी मी आणि माझे मिस्टर आम्ही दोघेच दवाखान्यात गेलो. मनात खूप शंका–कुशंका होत्या, पण मिस्टरांचा पाठिंबा आणि प्रेम याच्या जोरावर जे काही होईल त्याला सामोरे जायचे ठरविले.

२३ मे २००६ सकाळी ८:५५ वाजता मला ८ पौंडाचा म्हणजे चक्क ४ किलो वजनाचा एक गुट्गुटीत मुलगा झाला. बाल सुदृढ आणि सुखरुप होते. आणि डिलेव्हरी ही नॉर्मल झाली. डॉक्टरांनी देखील बाळाचे कौतुक केले. व त्यादिवसातील सुदृढ बालक म्हणून जाहीर केले. आमच्या दोघांचा तर आनंद गगनात मावेना. ही गोड बातमी सासूबाईंना कळताच सासूबाईंनी पाच किलो पेढे शेजारी पाजारी, जवळ असणाऱ्या दुकानांमध्ये देखील धावत पळत 'नातू झाला' या आनंदाने वाटले. बाळाला पाहताच त्यांच्या मनातील राग कुठल्या कुठे निघून गेला! त्यादिवसापासून अंधश्रद्धा, गैरसमजुती यांच्या आहारी जायचे नाही असे देखील त्यांनी ठरविले. एवढेच नाही तर त्या नंतर आलेल्या ग्रहणांबाबत शास्त्रीयदृष्ट्या असणारी माहिती त्या इतरांना पटवून देऊ लागल्या.

**अनिता कापरे**,
ऊर्मी, पुणे

# बिकट वाट वहिवाट बनावी

**फेब्रुवारी २०१८ मध्ये शिल्पा 'दिशा' संस्थेत रूजू झाली. तिथे तिने 'गाय वाटप व गोपालन' या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारली. खरे तर हे आव्हान स्वीकारले. एक बाई म्हणून तिला आलेले पितृसत्तेचे अनुभव, भेटलेली – जोडली गेलेली माणसे यासगळ्याबद्दल खूप आस्थेने, मनापासून केलेले हे कथन आहे.**

'दिशा' महिला सक्षमीकरण व ग्रामीण विकास या विषयांत काम करते. संस्थेत आल्यानंतर पहिले काही दिवस संस्था, कार्याची व्याप्ती व टिमला समजून घेणे यासाठी दिले. संस्थेच्या सर्व प्रकल्पांचे समन्वय करण्याची जबाबदारी असल्यामुळे सर्व आघाड्यांवर माझे काम चालू आहे.

'गायी वाटप व गोपालन प्रकल्प' हा संस्थेच्या महिला सक्षमीकरणासाठीच्या अनेक प्रकल्पांपैकी एक आहे. माझ्यासाठी गायींचा हा प्रकल्प खूप वेगळा आणि नवीन होता. म्हणून या संदर्भात वाचन–अभ्यास, गाय–गोठे तपासणी, प्रत्यक्ष भेटी, चर्चा असा उपक्रम मी सुरू केला.



### 'हे क्षेत्र पुरुषांचे आहे !'

याच दरम्यान या क्षेत्रात अनेक वर्षे काम केलेल्या काही अनुभवी व्यक्तींनी एक गोष्ट मला वारंवार सांगितली, 'हे क्षेत्र पुरुषांचे आहे.' खरेतर समोरच्या व्यक्तींकडून इथेच माझ्यासाठी हा विषय संपला होता किंवा संपवला गेला होता. पुढील काळातही असेच सांगणारे – समजावणारे भेटत राहिले, काहींनी मला हे काम जमणार नाही हे गृहीत धरून कामाचे वेगळे नियोजनही केले.

हे सर्व सांगणारे पुरुष होते. 'महिलांनी काही विशिष्टच कामे करावीत किंवा काही क्षेत्रात महिलांनी पुढे जाऊच नये अथवा त्यात पडूच नये' अशी ही पुरुषसत्ताक मानसिकता! या धारणेतून, या मानसिकतेतून सर्वांनी, महिला व पुरुष या दोघांनीही बाहेर पडण्याची गरज मला जाणवत होती.

### आव्हान स्वीकारले

समाजाची मानसिकता बदलायची तर बरीच कामे करावी लागणार होती. संधी न देताच ती नाकारली जाण्याचे दुःख मनात होते. मला 'हे काम जमणारच नाही' हे गृहीत धरून, परस्पर निर्णय घेतल्याचे दुःख होते. क्षणभर जाणवलेला एकटेपणा आणि डोळ्यातून ओघळलेले अश्रू बाजूला सारून पुन्हा एकदा तयारीने उभे राहाण्याची वेळ माझ्यावर आली होती. संपलेला

वा संपवलेला विषय मला नव्याने सुरू करायचा होता. आता हा विषय फक्त माझा न रहाता, महिलांकडे आणि त्यांच्या क्षमतेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठीचा एक लढाच मनात सुरू झाला होता. मनात सुरू झालेला हा लढा प्रत्यक्षात आणायचा तर जबरदस्त मानसिक आणि शारीरिक श्रम घ्यायची तयारी करावी लागणार होती. खरेतर महिला सक्षमीकरणाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करायची होती, पण आता त्या आधी मला स्वत:ला एक महिला प्रकल्प – व्यवस्थापक म्हणून सिद्ध करण्याची तयारी करावी लागणार होती.

कामाला सुरुवात झाली. मावळ व मुळशीभागातील गावांमधे गावसभा घेणे, गृहभेटी, प्रशिक्षणे, गोठे तपासणी करून योग्य लाभार्थींची निवड करणे असे कामाचे स्वरूप होते. काहीवेळा गावांमधे आमचे १० ते १२ तास काम चालू रहाते, सकाळी सात वाजता निघाले तरी घर गाठायला रात्रीचे अकराही वाजतात. गोठे तपासणीसाठी कधी पार डोंगरात तर कधी शेतात. २/३ जण मदतीला येतात बाईक घेऊन, मग त्यांच्या मदतीने न पोहचलेल्या कुटुंबापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतो.

दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे निवड झालेल्या लाभार्थ्यांना बाजारात गायी खरेदीला घेऊन जाणे. एप्रिलमध्ये मी पहिल्यांदा माझ्या दोन टिम सदस्यांसह आळेफाटा व कुरण बाजारात गेले. त्यानंतर लोणी–प्रवरा–संगमनेर व धुळे येथील गायींच्या बाजारात गेले. त्यानंतर साधारण १० ते १५ लाभार्थी कुटुंबातील पुरुष शेतकरी, गोपालक यांना घेऊन दर आठवड्याला गायी खरेदीला बाजारात निघायचे असा दिनक्रम सुरू झाला, जो आजतागायत चालू आहे.

धुळ्यासाठी प्रवास रात्री दहाला सुरू आणि लोणी संगमनेरसाठी मध्यरात्री ११ ते २ च्या मध्ये कधीही. कधी पिकअप टेम्पो वा इतर कोणतीही गाडी असो – लाभार्थींबरोबरच जास्तीतजास्त प्रवासाला निघायचे. कोणतेही वाहन असले तरी, मी पुढच्या सीटवर – कारण वाहनचालकाला जागे ठेवण्याची जबाबदारी माझी आणि मुख्य म्हणजे माझ्यामुळे मागे लाभार्थींना अडचण नको. २०१६ मध्ये झालेल्या अपघातात मला चांगलाच मार बसला होता, प्रवास बंद करणे शक्य नाही. पुढे बसल्यामुळे थोडे धक्के कमी बसतील आणि अधिक काळ काम करता येईल, एवढाच हेतू. रात्रीच्या–मध्यरात्रीच्या या प्रवासात रात्री १/२ वेळा चहा घेतला जातोच. आता चहाचे टपरीवाले, हॉटेलवालेसुद्धा चौकशी करतात नेहमीच्या ओळखीने.

तिसरे महत्त्वाचे काम म्हणजे प्रत्येक कामाची नोंद ठेवणे, रिपोर्ट बनविणे, हिशोब ठेवणे आणि प्रकल्पाची पूर्णपणे जबाबदारी

> गायींचा हा प्रकल्प महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी आहे. लाभार्थी कुटुंब निवडताना – वंचित, विकासापासून दूर, अल्पसंख्याक, होतकरू, शारीरिक वा मानसिक दृष्ट्या विशेष गरज असलेल्या व्यक्ती, तरूण–युवक–युवती, तसेच एकट्या राहणाऱ्या महिला, मुलींची संख्या जास्त असलेली कुटुंबे, मुलींना व महिलांना शिक्षण व आर्थिक प्रगतीसाठी प्रोत्साहन देणारी कुटुंबे, संकटग्रस्त व्यक्ती, कुटुंब वा गाव, महिला नेतृत्व असणारी व ग्रामपंचायतीच्या नियमांना धरून काम करणारी गावे, जाती–धर्माच्या भेदभावातून बाहेर पडून एकता आणि सलोखा जपणारी गावे.... अशा विविध निकषांवर आम्ही लाभार्थींची निवड करत आहोत. केवळ कागदावरच्या करकरीत नियमांच्या आधारे नव्हे तर वास्तव समजावून घेत, माणुसकीचा, स्त्रीवादी, समग्र दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून.
>
> गायींचा प्रकल्प, त्यातून मिळणारे अनुदान हे एक माध्यम आहे – महिला, कुटुंब व गावापर्यंत पोहचण्याचे आणि कुटुंबातील महिला, मुली व वंचित घटकांचे सक्षमीकरण करण्याचे. जाती–धर्मात वाढत चाललेली तेढ, मुली व महिलांवर होणारी हिंसा, अन्याय याही प्रश्नांना सोडविण्याचा प्रयत्न आम्ही या प्रकल्पाच्या माध्यमातून करत आहोत, खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास साधणे हे आमचे ध्येय आाहे.

घेऊन सर्वांशी समन्वय व संपर्क ठेवणे.

विविध कार्यक्रम, मुलाखतीत अनेकवेळा लोक विचारतात, ''एक महिला लिडर म्हणून वेगळ्या वाटा निवडताना, काम निवडताना काय अडचणी येतात?'' मी खरेतर प्रत्येक अडचणीकडे आव्हान म्हणूनच बघते आणि आव्हान स्वीकारूनच कामाचे नियोजन करते. आतापर्यंत याच पद्धतीने मी काम करत आले आहे.

**सार्वजनिक स्वच्छतागृह – एक मोठे प्रश्नचिन्ह**

कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तसेच प्रवासात महिलांसाठी आवश्यक अशा स्वच्छ, सुरक्षित आणि मोफत स्वच्छतागृहांचा अभाव ही काही नवीन गोष्ट नाही. गायी–खरेदीसाठीच्या प्रवासात आणि बाजारात या प्रश्नाला मला भिडावेच लागते. आता काही टोलनाक्यांवर स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे, पण तरीही प्रश्न संपलेला नाही. बाजारात स्वच्छतागृहे आहेत, पण त्यांची संख्या कमी, पाण्याचा अभाव, स्वच्छता ठीकठाक, बाजारात येणाऱ्या पुरुषांची संख्या खूप, त्यामुळे महिलांसाठीचे स्वच्छतागृहही पुरुषांना दिले जाते, आणि माझ्यासारख्या कोणी महिला आल्यावर थोडावेळ थांबण्यावाचून पर्याय उरत नाही. सध्यातरी स्वच्छतागृहांची सुविधा आहे हेच खूप.

वेळी–अवेळी प्रवास व धावपळ, मिळेल तेव्हा झोप व जेवण असा रोजचा दिनक्रम. वाढत्या वयानुसार होणारे शारीरिक बदल, मासिक–पाळीचे चक्र आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या अशा अनेक आघाड्या हसत–खेळत पार करत जाणे सोपे नाही. मी माझ्या पद्धतीने सर्व सोपे करून घेतले आणि प्रकल्पाच्या उद्देशांवर लक्ष केंद्रित केले. कुठल्याही परिस्थितीत आव्हान स्वीकारणे हा मूळ स्वभाव असल्याने बऱ्याच गोष्टी सोप्या होत गेल्या.

महिला अधिकारी म्हटल्यावर अनेक वेळा लोकांना शंका असते, यांना जमेल का काम करायला, निर्णय घ्यायला, वा आव्हानात्मक जबाबदारी पेलायला. कामाचा पसारा जसा वाढत गेला, तसा सर्वांना विश्वास वाटायला लागला की, ही बाई काहीही करू शकते आणि कोणतेही आव्हान पेलू शकते.

मी महिलांना कमी वा दुय्यम लेखणाऱ्या मानसिकतेला वा दृष्टिकोनाला बदलण्यासाठी प्रयत्न करत आहे, हे काम पुरुषांच्या विरोधात नाही. आज माझे नेतृत्व सन्मानाने स्वीकारून मला सहकार्य करणारे माझे सहकारी संतोष वंजारी आणि संदीप बिडकर, तसेच मार्गदर्शक ब्रिगेडियर जटारसर माझ्याबरोबर आहेत. गायींच्या बाजारातील मध्यस्थ व्यापारी, शेतकरी, डॉक्टर, लाभार्थी कुटुंबातून येणारे सदस्य, सरकारी अधिकारी या सर्वांचे सहकार्य मला मिळते आहे. म्हणूनच या सकारात्मक गोष्टींच्या नोंदी इथे नमूद करणे मला महत्त्वाचे वाटते. सर्वांसाठी या अशा प्रकल्पासाठी एक महिला अधिकारी असणे हेच काहीसे नवे होते–आहे.

**आपुलकीचे आगळे नाते**

गायींच्या बाजारात संस्थेने नेमणूक केलेले मध्यस्थी खलील नवाब शेख व त्यांची मुले नदीम व अक्रम यांचे कायम सहकार्य असते. व्यवसाय, व्यवहार यांच्या पलीकडे जाऊन या सर्वांचे सहकार्य मिळत आहे.

गीर गायींचा बाजार मंगळवारी धुळ्यात आणि काळी–पांढरी (एच. एफ. होल्सटीन फ्रीसिएन) गायींचा बाजार बुधवारी लोणी प्रवरात भरतो. सोमवारी कधी दिवसा तर कधी रात्री आमचा प्रवास सुरू, रात्रभर प्रवास, मंगळवार बाजारात खरेदी, काम पूर्ण झाल्यावरच परतीची वाट धरणार, आणि बुधवारची तयारी सुरू. पण थांबायचे कुठे हा मोठा प्रश्न – खर्चापेक्षा सुरक्षितता हा मुद्दाही होताच – आम्ही हॉटेल, भक्तनिवास असा विचार करत होतो. बुधवारी लोणी बाजारात लाभार्थींचा दुसरा गट येणार, आम्हाला घरी जाऊन परत येणे शक्यच नाही. शेख चाचांनी मला, टिमला त्यांच्या घरी नेले. म्हणाले, ''आप हमारे बेटी के जैसे हो'', सर्वच प्रश्न निकालात निघाले. जेव्हा कधी गरज पडते तेंव्हा माझी आणि माझ्या टिमची काळजी शेख कुटुंबीय घेते, आणि मग कुठलेच व्यवहाराचे गणित मांडता येत नाही – फक्त आपुलकीचे नाते तेवढे उरते.

'लाभार्थींचे गायींचे टेम्पो जोपर्यंत बाजाराच्या गेटमधून सुखरूप बाहेर पडत नाहीत तोपर्यंत जेवण घ्यायचे नाही' – असा अलिखित नियम काम करताना तयार झाला आहे, मग संध्याकाळचे सात वाजले तरी चालतील. अशा पद्धतीने काम

करणारे शेख चाचांसारखे व्यक्ती विरळाच. बाजारात फिरताना, शेडमधे बसलेले असताना – बाजारातील बदल, गायींचे आजार, किंमती... अनेक लहान–मोठ्या विषयांवर शेख चाचा मला आणि टिमला माहिती सांगत असतात. शेख चाचांकडून दर आठवड्याला काही ना काही नवीन शिकणे आणि समजून घेणे चालूच असते माझे, आणि टिमचे. ''जेवलात का?'' ''घरी पोहचलात का?'' ''आराम करा'', असे विचारून काळजी घेणारे शेख चाचा व त्यांचे कुटुंबीय सतत आमच्या संपर्कात असतात.

या सर्व गोष्टी विस्ताराने मुद्दामच इथे नमूद करत आहे. आज समाजात वाढत चाललेली तेढ, तणाव, स्वार्थी व्यवहार या सर्व गोष्टी एका बाजूला आणि जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन आपुलकी जपणारे शेख कुटुंब दुसऱ्या बाजूला. शेती, मेहनत करून जसे शक्य होईल तसे शेख कुटुंबीय गावातही अनेकांना मदत करतात आणि माणुसकीचे नाते जपताना दिसतात.

''एक बाई –रात्री –अपरात्री, १० ते १५ पुरुषांबरोबर प्रवास करते, गावात संध्याकाळी, रात्रीच्या गावसभा भरविते, गायींच्या बाजारात लाभार्थींबरोबर फिरते– व्यापारी लोकांशी बोलते, आठवड्यातील २–२ दिवस घराबाहेर रहाते, याबद्दल अनेक विचार, प्रश्न, शंका अनेकांच्या मनात असतात.

पण आता मला त्यावर विचार करण्यात वेळ वाया घालवायचा नाही. मी जे सामाजिक काम करते ते १००% इमानदारीने, आत्मविश्वासाने आणि टिमच्या सहकार्याने करते. माझी वाट वेगळी, खडतर वा कठीण असली तरी मी चालत राहाणार, कारण आज मी या वाटेवरून चालले तरच ती बनेल उद्याची पायवाट आणि परवाचा हमरस्ता. जेव्हा प्रत्येक स्त्रीला एक व्यक्ती, माणूस म्हणून बघितले जाईल, तेव्हा माझेच नाही तर सर्वांचेच जगणे सोपे होईल. ही वेगळी वाट जेव्हा सर्व जाती–धर्मभेद, लिंगभेद, अन्याय, हिंसा या सर्वांना छेदून माणुसकीची–आपुलकीची वाट बनेल, तेव्हा सर्वांचे जगणे, न्यायपूर्ण, सन्मानाचे आणि आनंददायी असेल.

**शिल्पा कशेळकर**,
दिशा, तळेगाव दाभाडे



# प्रश्नांना भिडण्याची हीची न्यारीच रीत

मी मुळशी तालुक्यात छोट्या गावात राहणारी महिला आहे. महिलांचं जीवन हे नेहमीच अवघड असतं. कुणाचं सोपं असतं तेही कधी ना कधी कोणत्या वाटेवर अवघड परिस्थितीत जातं. माझ्या जीवनात असंच घडलंय. माझे मिस्टर नेहमीच घरातल्याबद्दल कोणी काय सांगितलं तर तेवढ्यावरच विश्वास ठेवणार. एके दिवशी असंच कोणीतरी त्यांना काही तरी सांगितलं. त्यांनी घरी येऊन चिडचिड केली. मी विचारलं, ''कशावर ऐवढी चिडचिड करताय? काय झालं?'' त्यांनी काही न सांगता मला मारहाण करायलाच सुरुवात केली. खूप मारलं. शांत झाल्यावर मी विचार केला, ह्यांना कोणीही काहीही सांगितलं तर त्यांनी ते पूर्णपणे आधी मला सांगितलं पाहिजे की माझ्याविषयी कोणी काय बोललंय ते. पण ते न सांगताच मारत सुटायचं. अशावेळी आपल्याला कोण मदत करणार ? डोळे असून आंधळे अशी परिस्थिती झालीये आपली. आपण स्वतःचा विचार केला पाहिजे. मारहाण केल्यानंतर त्यांनी शिव्यागाळी केल्या, ''जा तू इथून. घरी थांबू नको.'' मला फुल टेन्शन आलं. पण मी त्या परिस्थितीत तिथेच थांबले, कारण माझी मुलं मोठी होती आणि शाळेत शिक्षण घेत होती. पेपर चालू होते. मी जर गेले तर सगळ्यांचं नुकसान होणार होतं. तेव्हा मग मी निर्णय घेतला की आपणच कायतरी तोडगा काढला पाहिजे. आपलं जीवन संपवून उपयोग नाही. आपलं जीवन मोलाचं आहे. तो दिवस जाऊ दिला. पण दुसऱ्या दिवशी मी स्वत:च्या हातातल्या बांगडया काढून टाकल्या. ग्रामीण भागामध्ये लग्न झालेल्या बाईच्या हातात बांगडया असणं गरजेचं असतं. त्यामुळे मी काय केलं स्वत:च्या हातातल्या बांगड्या काढल्या, गळ्यातलं काढलं, कानातलं काढलं, अंगावर काहीही ठेवलं नाही. जोडवे, पटट्या सगळं काढून ठेवलं. तर ते दुसऱ्या दिवशी म्हणाले, ''हे काय तू हातातल्या बांगडया वैगरे का काढल्या?'' मी म्हणाले, ''तुमचा माझ्यावर विश्वासच नसेल तर मी काही काहीही घालणार नाही. हे सर्व कशासाठी? बायको म्हणून हे सौभाग्यलंकार घालायचे आणि तुमचा मार खायचा. मग हे घालायचे कशासाठी? मला नकोत. येथून पुढे तुम्ही असचं वागणार असाल तर मी काहीही घालणार नाही.''

आमच्या घरी तेव्हा पाहुणे आले होते. ते मला म्हणाले, ''काय गं, तुझ्या बांगडया फुटल्या काय?'' मी म्हटलं, ''काय नाही, ते आमचं आमचं आहे. मी नंतर सांगेल.'' पाहुणे गेल्यानंतर मुलं म्हणाली, ''आई बांगड्या घालं. ते बरोबर नाही दिसत. अप्पांकडे आम्ही बघून घेऊ.'' मी म्हटलं, ''नाही, ते स्वत: जेव्हा म्हणतील की येथून पुढे तुला असं बोलणार नाही. तेव्हा मी हे करणार नाही. मी अशी राहिली की लोकांना कळेल की ते कसे छळ करतायंत हे. कुणाचं ही बाहेरच्याचं ऐकून ते आपल्याला त्रास देत असले तर असलं जीवन जगण्यापेक्षा सगळे बंधन तोडूनच जगू देत ना.'' मग म्हणाले, ''हे चांगलं नाही. तू आपली ते घालं. मी तुला काहीही बोलणार नाही. माझंच चुकलं.'' तेव्हापासून ते काहीही बोलत नाहीत. आणि बाहेरच्यांनी कोणीही काहीही सांगितलं तरी त्यावर विश्वास ठेवत नाहीत.

त्यावेळी मी इतकं धैर्य दाखवलं त्यामुळे हा बदल झाला. अशा प्रसंगांना बाईने गंभीरपणे तोंड दिलं पाहिजे. आपण मुकाटपणे सहन केलं , त्याला विरोध केला नाही, तर तो सतत आपल्या जीवनात घोटळत राहतो. आपलं जीवन बरबाद होतं आणि घरातल्या मुलां-लेकरांना पण त्रास होतो.

सत्यकथनावर आधारित

(लेखनासाठी साहाय्य अनुराधा शेलार, तनजिम खानजादे)

# हमारे मन क

मला असं वाटतं मंदिर ८०० वर्षं जुनं आहे. त्यावेळी हा नियम असेल. आता तर आपण २०१८ मध्ये जगत आहोत. तर त्यामुळे कालानुरूप बदल होत राहणे गरजेचं आहे. सर्वांनी त्याचा स्वीकार करण्यास काही हरकत नाही. यामध्ये १० ते ५० वयोगट हा मासिक पाळी येणाऱ्या महिलांचा गट आहे म्हणजे हे सर्व चक्र हे धार्मिक गोष्टींभोवती मुख्यतः फिरताना दिसतं. माझ्या मते या मंदिरात समस्त स्त्री-पुरुषांना प्रवेश मिळायला पाहिजे.

कारण ८०० वर्षापूर्वी मासिक पाळीविषयी असणारा दृष्टिकोन हा आपण २०१८ मध्ये ठेवता कामा नये. यातून पावित्र्य - अपावित्र्याच्या संकल्पनांभोवती हे सारं फिरताना मला वाटतंय. परंतु ज्या स्त्रिया या गोष्टीला विरोध करतात त्यांच्या मनावरही या गोष्टींचा पगडा असल्यामुळे त्यांचा विरोध होत आहे. माझ्या मते या स्त्रियांसाठी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. जास्तीत जास्त लोकांनी वैज्ञानिक दृष्ट्या विचार करावा असं मला वाटतं. न्यायालयाची भूमिका योग्यच आहे.

१. त्यामुळे सर्व स्त्रियांना मंदिरात प्रवेश मिळेल.
२. राज्यघटनेची पायमल्ली होणार नाही.
३. त्या दिवसांत स्त्रीला कोणी अपवित्र समजणार नाही.
४. यातून मासिक पाळीविषयी असणारी नकारात्मता स्त्रियांच्या मनातून निघून जाईल.
५. समानता येईल.

**शीतल जाधव**

हा भेदभाव कशासाठी? देवांना पण जन्म देणारी ही एक माता (स्त्री) असते. मग त्या स्त्रियांना दर्शन का नाही? स्त्रियांबद्दल भेदभाव करणे हे चुकीचे आहे.

**मनीषा शिळक**

जुन्या प्रथा आणि धार्मिक रूढी या बदलू शकण्याचा प्रयत्न केला तर हिंदुत्ववादी लोक याला बदलून देणार नाहीत. स्त्रियांवर अत्याचार चालूच ठेवण्याचा प्रयत्न आहे. देशातील संविधान आणि कायदा याला काहीच महत्त्व नाही का? खरंतर याविरोधात आवाज उठवला पाहिजे.

आपण म्हणतो की परमेश्वराला सर्व मुले सारखी असतात. मग त्याच्या दर्शनाला येणारे सर्व समान नाहीत का? देवाच्या नावाखाली हे लोक जातीयता आणि उच्चनीचता निर्माण करतात आणि एकमेकांमध्ये भांडणं लावून हिंसा करण्याचा प्रयत्न करतात. स्त्री-पुरुषांमधला, जाती-जमातींमधला भेद नष्ट करायला हवा म्हणजे हिंसा होणार नाही. आणि संपूर्ण देश एकोप्याने राहील आणि सुंदर दिसेल.

**आशा जाधव**

मला कोर्टाने दिलेली परवानगीची भूमिका पटते, कारण घटनेप्रमाणे स्त्री-पुरुष समानता आहे. तर स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणे मंदिरात प्रवेश मिळाला पाहिजे. पण काही धार्मिक लोकांना हे पटत नसेल तर त्याला विरोध करणे म्हणजे दगंल, मारहाण हा त्याच्यावर उपाय नसावा. कारण त्यातून कोणालाच त्याचा फायदा होणार नाही. झाले तर नुकसान होईल. यामध्ये सर्वात जास्त नुकसान सामान्य जनतेचे होते. त्यांनी त्यांची बाजू न्यायालयातच मांडावी किंवा चर्चा करून अशा प्रकारच्या प्रश्नावर तोडगा काढावा असे मला वाटते.

**अपर्णा धर्माधिकारी**

# ा की बात...

गेले काही महिने शबरीमलाचं, महिलांच्या मंदिर – प्रवेशाचं प्रकरण खूप गाजत आहे. यासंदर्भात आम्ही दिशाच्या वेगवेगळ्या कार्यकर्त्यांची मतं जाणून घेतली, या सर्व प्रकाराबद्दल त्यांना काय वाटतं, कोणाची भूमिका पटते, का हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला. तसंच ऊर्मी संस्थेच्या मदतीनं 'भोईरवाडी' गावातल्या महिलांची मतंही जाणून घेतली. ते संकलन इथे त्यांच्या शब्दात देत आहोत. त्यापूर्वी त्यांच्या समोर आम्ही वस्तुस्थिती सांगणारी माहिती ठेवली होती. ती अशी : केरळमध्ये शबरीमाला हे अयप्पाचं ८०० वर्षं जुनं मंदीर आहे. अयप्पा हा ब्रम्हचारी देव आहे. १० ते ५० या वयोगटातील स्त्रियांना या मंदिरात प्रवेश नाही. या विरोधात कायद्यासंदर्भात काम करणाऱ्या एका संस्थेनं जनहित याचिका दाखल केली होती. त्या संदर्भात काही महिन्यांपूर्वी सर्वोच्च न्यायालयानं निकाल दिला की '१० ते ५० या वयोगटातील स्त्रियांना या मंदिरात प्रवेश दिला जावा. स्त्रियांविरुद्ध असा भेदभाव करणे घटनाविरोधी आहे.' देवस्थानाचं म्हणणं असं आहे की 'ही धार्मिक परंपरा, प्रथा आहे, खूप जुनी परंपरा आहे, त्यामध्ये कोर्टाला हस्तक्षेप करता येणार नाही.' त्यांनी कोर्टाच्या या निर्णयाला विरोध केला. केरळमध्ये भाजप आणि हिन्दूत्ववादी संघटना यानिर्णयाविरोधात मोठ्या संख्येनं रस्त्यावर उतरल्या. त्यामध्ये स्त्रियांची संख्याही खूप मोठी होती. काँग्रेसनंही बोटचेपी भूमिका घेतली. केरळ सरकार न्यायालयाच्या निकालाच्या बाजूनं ठाम उभं आहे.

ह्या प्रसंगात महिलांचे सामाजिक स्थान पण कळते। समाजामध्ये अजूनही महिलांना कायद्यानुसार समान हक्क नाही। यामध्ये राजकीय महिलाही महिलाच्या विरुद्ध बोलतात। कारण स्वतःच्या पक्षाच्या विरोधात त्यांना बोलता येत नाही। निवडणुका जवळ आल्या आहेत। त्यामुळे पक्षपण त्या वातावरणाप्रमाणे वागत आहेत।

**अपर्णा कुलकर्णी**

हे मंदिर जर ८०० वर्षे जुने असले तरी आता स्त्री–पुरुष समानता हा कायदा निर्माण झाला आहे। म्हणून सर्व स्त्रियांनाही मंदिरामध्ये जाण्याचा अधिकार असला पाहिजे। स्त्रियांविरुद्ध असा भेदभाव करणे चुकीचे आहे।

**सुजाता टाकळकर**

समाजामध्ये दंगली घडवून आणण्याचे काम हे हिंदुत्ववादी संघटना व देवस्थानचे ट्रस्ट ह्याच्यामुळेच घडते। कोणत्याही मंदिरामध्ये प्रत्येक व्यक्तीला जाण्याचा अधिकार आहे। हे सर्व प्रथेला धरून चालत राहिले तर समाजसुधारणा झाली आहे असं कसं म्हणता येईल? जर सर्वोच्च न्यायालयाने महिलांना मंदिरात जाण्यासाठी परवानगी दिली आहे तर तुमची प्रथा सांगते म्हणून तुम्ही महिलांना मंदिरात जाऊ देत नाही, त्यांना धक्काबुक्की करता। हा कोणता न्याय?

**अरूणा पवार**

मला असं वाटतं की सर्वोच्च न्यायालयानं जो निकाल जाहीर केला तो अगदी बरोबर आहे. जर स्त्रियांनी या मंदिरात प्रवेश केला तर त्रास होईल तो फक्त बुरसटलेल्या विचाराच्या माणसांना. 'मीपण' असणाऱ्या पुरुषांना.

मला तरी वाटतं जगात असला कोणताही देव नसेल की त्याला त्याच्या दरबारात स्त्री चालत नाही. कारण तो देव असला तरी त्याला जन्म देणारी आई ही एक स्त्रीच असते.

स्त्रीला मागे पाडण्याचे तसेच कमीपणा कसा दाखवता येईल हेही कारण आहे. देवाला स्त्रीच्या हाताने केलेला नैवेद्य चालतो. पण तिने त्यांच्या दर्शनासाठी मंदिरात आलेलं चालत नाही हा कसला न्याय?

स्त्रियांचे अस्तित्व न स्वीकारणारे पुरुष जास्त जबाबदार आहे असं मला वाटतं. मुळात स्त्री देवळात गेली तर येऊन येऊन काय संकट येणार आणि ते स्त्री देवळात गेली म्हणून झालं असं म्हणणं चुकीचं आहे.

या घटनेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा गुंतलेला आहे तो म्हणजे स्त्रीच्या मान-सन्मानाचा. कायद्याची भूमिका मला पटते.

**स्नेहल थोरवे**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा योग्य आहे व हा निर्णय सर्व लोकांनी म्हणजेच सर्व राजकीय लोकांनी मान्य करायलाच पाहिजे. ही परंपरा ८०० वर्षे जुनी असली तरीसुद्धा आपण २१व्या शतकात जगत आहोत. त्यामुळे आपली विचार करण्याची पद्धत बदलायला हवी. आणि या निर्णयाला विरोध करण्यामध्ये स्त्रिया सुद्धा आहेत. हे तर चुकीचे आहे. जर स्त्रियाच असे वागत असतील तर ही बंधने अजूनच लादली जातील.

**ऐश्वर्या वाघमारे**

शबरीमला या मंदिरामध्ये १० ते ५० या वयोगटातील महिलांना/मुलींना प्रवेश नाही याचा अर्थ या वयामध्ये मासिक पाळी सुरू होते व या कालावधीमध्ये महिलांनी मंदिरातच काय कोठेही प्रवेश करू नये अशी अलिखित व अज्ञानातून निर्माण केलेली परंपरा आहे.

मासिक पाळी ही एक नैसर्गिक शारीरिक क्रिया आहे. ती एक प्रजनन प्रक्रिया आहे. या काळात कोणतीही स्त्री अशुद्ध नसते.

परंतु भारतीय परंपरांचा पगडा असलेले काही लोक, संघटना, सत्ताकर्ते, वरिष्ठ पदावर असणाऱ्या महिलासुद्धा भारतीय 'संविधान', कायदा, न्यायव्यवस्था यांचा अनादर करून बेताल वक्तव्य व कृती करत आहेत. यामध्ये सर्वसामान्य जनता, या व्यवस्थेचा आदर करणारी जनता भीतीदायक वातावरणात जगत आहे. कारण देशात सत्तेत असणारी मंडळी न्यायव्यवस्थेच्या या निर्णयाला नाकारून शबरीमलाच्या परंपरेच्या बाजूने मत मांडताना दिसतात.

माझ्या मते ज्या परंपरेमुळे एखाद्या व्यक्तीचा, समाजाचा, वर्गाचा, माणसाचा द्वेष होणार असेल व ती देशाचे संविधान व न्यायव्यवस्थेस धुडकावत असेल तर अशी परंपरा बंद झालीच पाहिजे.

उदा. महिलांना शिक्षण बंदी, सती जाणे, पोशाख अधिकार या आणि अशा अनेक 'बंधनातून' परंपरांचे बंधन झुगारून महिला कायद्याचा, अधिकारांचा अवलंब करून पुढे जाताना दिसत आहेत. खरेतर महिला पुरुष समान हे शब्दामध्ये सगळीकडे मिरवले जाते. पण प्रत्यक्ष व्यवहारात, जगण्यात उतरताना दिसत नाही, याचे वाईट वाटते.

**संतोष वंजारी**

या घटनेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल योग्य आहे. आज आपण म्हणतो की जग सुधारते किंवा जग प्रगतीच्या दिशेने वाटचाल करते आहे पण जर आपण आपल्या पूर्वीच्या प्रथा बंद नाही करू शकत तर आपण कोणत्या कारणाने जग सुधारले असे म्हणू शकतो?

स्त्रियांना पूर्वीपासून तुम्ही हे करू नका, तुम्ही इथे जाऊ नका, स्त्री म्हणजे काचेचे भांडे असे बोलले जाते. हे सर्व बंद झाले पाहिजे.

अशा प्रथा बंद होत नाही याचे मला वाईट वाटते.

**प्रविण भोईरकर**

'१० ते ५० या वयोगटातील स्त्रियांना मंदिरात प्रवेश नाही' असं देव बोलू शकत नाही; कारण देवाला सर्व माणसे समान आहेत. हा दोष, ही प्रथा माणसांनी बनविलेली आहे, हे कोणत्या देवाने नाही सांगितले.

**वर्षा बांगर**

**भोईरवाडीच्या गटातल्या सगळ्या मैत्रिणींनाही वाटत होतं** – सगळ्या बायकांना मंदिरप्रवेश दिला पाहिजे. कारण मासिक पाळी काही अपवित्र नसते. पाळी नसती तर प्रजननच झाले नसते. 'देव काही आकाशातून खाली आलाय का? त्याला जन्म देणारी पण एक स्त्रीच आहे ना !'

'स्त्री–पुरुष समानता आहे असं म्हणायचं? पण बऱ्याच देवळांमध्ये स्त्रियांना जाऊ देत नाहीत. मग स्त्री–पुरुष समानता नेमकी आहे कुठे तेच कळत नाही. राजकारणात पण तेच चाललंय. बाईच्या शेजारी बसून नवराच सगळं सांगत असतो.'

एकजण म्हणाली, ''तो ब्रह्मचारी देव आहे म्हणून बायकांना जाऊ देत नसतील.'' त्यावर अंगणवाडीताई म्हणाल्या, ''मारुतीपण ब्रह्मचारी आहे. तुम्ही देवळात जाऊन पाया पडताच की.'' ''काही ठिकाणी अजूनही जाता येत नाही. गावकीच्या भैरोबाच्या देवळात जाऊ देत नाहीत.''

एकीला तरीही शंका होती की बायकांना मंदिर प्रवेश नाकारण्यामागे मासिक पाळी हेच कारण आहे का?

एकजण म्हणाली, ''मला वाटतं तो ब्रह्मचारी देव आहे, स्त्रिया तिथे गेल्या तर त्याचे ते हे भ्रष्ट होईल ना.''

त्याला दुजोरा देत एकीनं उदाहरण दिलं ते शंकराचार्यांचं. 'त्यांना बायकांची सावलीपण चालत नाही, असं ऐकलंय.' यानंतर त्यावरही आम्ही बराच वेळ चर्चा केली. स्पर्शाचा विटाळ, सावलीचा विटाळ, बाईचा आणि खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींचा विटाळ, त्यातलं साम्य, अपमान आणि मानहानी, शोषण.

एका शबरीमला घटनेच्या निमित्तानं पुरुषसत्ताक – जात वास्तवाचे अनेक धागे, त्यांचं एकमेकांशी असलेलं नातं उलगडत गेलं. राजकीय पक्षांची सरड्याप्रमाणे रंग बदलण्याची वृत्ती आणि सत्ता लोलुपता याचं घाणेरडं दर्शनही झालं.

– या चर्चेत **अल्पना भोईर, कोमल हरगुडे, प्रतिमा तुपे, मनीषा तुपे, अनिता हरगुडे, राजश्री तुपे, गीता भोईर, वर्षा भोईर** यांचा सहभाग होता.

# फक्त 'शिडी'ची आठवण ठेवा

प्रिय मैत्रिणींनो,

सस्नेह नमस्कार.

कशा आहात, सर्वजणी?

तुमच्याशी आज मी एका वेगळ्याच विषयावर बोलणार आहे.

ही कहाणी आहे संगीता आणि रजनी या आमच्या दोन कार्यकर्त्यांची! संगीता ताई ह्या आमच्या केंद्रात विशेष मित्रांसोबत* काम करायच्या तर, रजनीताई केंद्राबरोबर आमच्या महिला विकासातही काम करायच्या. संगीताताई गावात रहायच्या तर, रजनी ताई वस्तीवर!

दोघींची उंची बेताची, बारीक अंगकाठी आणि अंगी चपळपणा एवढा, की सांगेल ते काम आवडीनं आणि पटकन् करणार. मग मीच म्हणायची, ''आता बसा थोडावेळ.'' त्या हसायच्या, मी मागं वळून बघेपर्यंत पुन्हा पुढच्या कामाला लागलेल्या असायच्या.

त्या दोघींच्या दिसण्या–वागण्यातला सारखेपणा पाहून, इतरांना मी गमतीनं म्हणायचे, ''ह्या बघा, आल्या जुळ्या बहिणी.'' इतर कार्यकर्त्या हसायच्या. दिवस असेच मजेत चालले होते, त्यांच्या कामसूपणामुळे आणि विलक्षण प्रामाणिकपणामुळे, त्यांच्यावर आम्ही अधिकाधिक विसंबून रहायला लागलो.

दरम्यान, त्यांच्या खासगी आयुष्यातही अनेक वळणं आली. संगीताताईंना सासूचा जाच, नवरा विक्षिप्त तर रजनी–ताईंना दारूड्या नवऱ्याचा काच! रजनीताई हिमतीच्या, नवरा दारू पिऊन त्रास द्यायला लागला की, मला, आमचे सहकारी मंगल ताईंना ऐन बारा वाजताही फोन करायच्या. मग आम्ही त्यांना सांगायचो, ''धीर सोडू नका. वस्तीतल्या महिलांना बोलवून घ्या'. आम्ही वस्तीतल्या इतर महिला कार्यकर्त्यांना फोन करायचो, त्या त्यांच्या मदतीला जायच्या, पण तरीही दिवसा (त्यांना आदल्या रात्री एकदा घराबाहेर काढलं म्हणून) आम्ही केंद्रातल्या सर्व महिला कार्यकर्त्या गेलो, त्यांच्या नवऱ्याला समज दिली, पोलिसांत केस दाखल करू म्हणून धमकीही दिली. ''साधना'च्या मदतीनं, रजनी ताईंनी चालवलेलं दुकान तर मोडून तुम्ही खाल्लं, आता त्याना नेटानं काम तरी करू द्या...'' वगैरे सुनावलं. काही दिवस तर, त्या गुपचूप आलोचनाच्या मदतीनं दुसऱ्या संस्थेत निवाऱ्यालाही गेल्या. त्यांच्या ह्या साऱ्या वाटचालीत 'साधना' संस्था त्यांच्या सोबत होती, पण हेही तितकंच खरं की, रजनी ताईंचे सर्व मूळचे गुण उजळून निघाले. महिला विकासाच्या आमच्या बैठकीत त्या म्हणायच्या, ''मी कौटुंबिक हिंसेला तोंड दिलं, गप्प बसले न्हाई. अशा माझ्यासारख्याच महिलांना मी मदत करील.'' आम्हाला त्यांचा खूप अभिमान वाटायचा.

संगीता–ताईंची जातकुळी सोसणाऱ्यांच्या गटातली; पण त्यांनाही 'साधना'च्या पाठिंब्यानं पायात बळ यायचं.

दुसरीकडं आम्ही दोघींच्या मुलांच्या शिक्षणासाठी पाठपुरावा करू लागलो. अपेक्षेप्रमाणे त्यांच्या मुलींचा प्रतिसाद अधिक होता. मग त्यांच्या दोघीही मुलींनी दहावी ओलांडली, त्या आपली मतं ठामपणे मांडू लागल्या, लिहू लागल्या, आमच्या युवती मंचच्या मार्फत कार्यक्रमांना जाऊ लागल्या, एव्हढंच नव्हे तर, 'चुलीपल्याड'साठी त्यांनी आपले अनुभवही लिहिले.

संगीता–ताईंच्या मुलीला, कविताला कॉम्प्युटरच्या टॅली कोर्सला पाठवलं, रजनीताईंच्या मुलीला सुषमाला तर, आलोचनाच्या ताईंनी आपल्या घरात ठेवून घेतलं, तेही विना मोबदला! दिवस पुढे सरकले आणि मग छोटी, छोटी वादळं यायला लागली. ती कधी व्यक्तींच्या स्वरूपात, कधी विचारांच्या स्वरूपात! कधी, कधी तर नुकत्याच पंख फुटलेल्या लेकीच्या स्वप्नाच्या स्वरूपात! रजनीताईंचे इतर कार्यकर्त्यांशी मतभेद व्हायला लागले. आपल्याला दोन दिवसांची रजा हवी, असं सांगून, रजनीताई आठ पंधरा दिवस कामावर आल्याच नाहीत.

------------

* मतिमंद व मनोरुग्ण व्यक्ती

मग नंतर कानावर आलं की, त्या पुण्याला कामाला लागल्यात. आलोचनाच्या ताईंचा निरोप आला की, कुठलाही निरोप न सांगता, सुषमा निघून गेली आणि भाड्याच्या खोलीत राहण्यासाठी आपले सामान घेऊन गेली. न सांगता, न सवरता निर्णय घेतला याबद्दल कुठलीही दिलगिरी व्यक्त न करता! चार महिन्यांपूर्वी गेलेल्या, रजनी ताई त्यांच्या गावाला, वस्तीत येतात पण साधना केंद्राला भेट देण्याचे कष्ट घेत नाहीत!

संगीता-ताईंच्या बाबतीत थोडं वेगळं घडलं-त्यांचे केंद्रातल्या, इतर महिलांशी कामावरून मतभेद झाले, त्यांनी समजुतीनं घ्यावं म्हणून आम्ही सर्वांनी खूप प्रयत्न केले पण काही उपयोग झाला नाही. समजुतीनं घेण्यापेक्षा, त्यांना संस्था सोडणं योग्य वाटलं आणि त्याही मग आपल्या मुलीच्या सल्ल्यानं, पुढाकारानं पुण्याला गेल्या. आम्हाला कुणालाही न सांगता सवरता! तिथेच त्यांनी काम शोधलं. आमच्या कार्यकर्तीनं फोन केल्यावर म्हणाल्या, संस्थेच्या बचतगटामार्फत घेतलेले कर्जाऊ पैसे परत देते असं; पण तेव्हढंच!

आता तुम्ही म्हणाल, ''पण ताई, हे तुम्ही आम्हाला का सांगताय?'' तर, काही लोक असंही म्हणतील, ''अहो, यात काय नवलाचं आहे? या कहाण्यातली नावं-गावं बदलली तर, सगळीकडं तोच अनुभव! तुम्ही उगाच माणसांच्या भलेपणावर विश्वास ठेवताय. 'गरज सरो, वैद्य मरो' हा तर सगळीकडचाच अनुभव! अहो, ताई, कार्यकर्ती झाली, तरी माणूसच ना? त्यांचे पाय पण मातीचेच!''

मैत्रिणींनो, तुम्हाला काय वाटतं? आपण कार्यकर्ता म्हणून इतरांपेक्षा आपली वागणूक वेगळी असावी असं तुमच्यापैकी कितीजणांना वाटतं? ज्या 'शिडी' चा उपयोग करून आपण पुढे गेलो, त्या शिडीला, त्यातल्या पायऱ्यांना आपण लक्षात ठेवायचं की, नाही? आपण आपली प्रगती करून घेतली, आपली मुलं, मुली पुढं गेली, तसं आपण इतर महिलांना मदत करायची की, नाही?

मला कळवाल तुमची मतं? तुमचे याबाबतीतले अनुभव? मी वाट पहाते.


खूप, खूप शुभेच्छा,

आपली मैत्रीण,

**मेधा टेंगशे**,

साधना व्हिलेज, चिखलगाव.

# कॉम्रेड शांताताई रानडे : आदरांजली




छायाचित्र - विद्या कुलकर्णी

स्त्री चळवळीतल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, साम्यवादी नेत्या शांताताई रानडे यांचं नुकतंच वयाच्या ९३व्या वर्षी निधन झालं. त्यांनी स्वातंत्र्यलढयात त्याच प्रमाणे संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, बेळगाव सत्याग्रह अशा विविध आंदोलनांमध्ये भाग घेतला होता, त्यासाठी तुरुंगवासही भोगलेला होता. त्यांचं व्यक्तिमत्त्व अतिशय शांत, प्रसन्न, निगर्वी होतं. ९० व्या वर्षीही त्यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असाच होता. दलित, वंचित यांच्या लढाईत, हक्कासाठीच्या सर्व लढयांमध्ये मग तो आरोग्याचा हक्क असो, रेशनचा असो वा शिक्षणाचा त्या नेहमीच अग्रेसर असत. वक्तशीरपणा, सर्वांना सर्व प्रकारची मदत करणं ही त्यांची लोभस वैशिष्ट्यं होती. मृत्यूच्या आधी काही महिने त्या रुग्णालयात होत्या. तेव्हा तिथेदेखील त्यांनी 'रशियन क्रांतीची १०० वर्षे' या पुस्तकाचं भाषांतर केलं - तेही लेखन तितकंच सुवाच्य, नेटकं. अशा या आगळ्यावेगळ्या शांताताईंना भावपूर्ण आदरांजली आणि क्रांतीकारी लाल सलाम.

# माझ्या मनाचा दुखावलेला कोपरा

मी लहान होते. ४थी पास होऊन ५वी मध्ये गेले. मला आई–वडिलांनी आजोळी शाळा शिकण्यासाठी पाठविले. त्यावेळी माझा सर्वात छोटा भाऊ नुकताच जन्मला होता. आम्ही तीन भावंडे, दोन भाऊ व मी, मी सर्वांत मोठी.

मला लहान भाऊ खूप आवडायचा. मधला आणि मी चार वर्षांचे अंतर, तर छोटा आणि मी आठ वर्षांचे अंतर त्यामुळे मी लहान भावाचे खूप लाड करायचे. त्याला आईने झोक्यात टाकले की गाणे बोलून, झोका हलवून झोपवायचे. परंतु वडिलांनी शिकण्यासाठी आजोळी पाठविले, मला आजोळी करमायचे नाही.

मी खूप–खूप रडायचे. 'मला घरी आईकडे जायचे' असे सांगायचे. एक दिवस मला आजोबांनी चिडून आजीसोबत आई–वडिलांकडे पाठवून दिले. मी घरी पोहचले. मला आनंद झाला. परंतु आजीने 'ही रडते म्हणून तिला घेऊन आले' असे सांगताच माझे वडिल कडाडले, आमच्या शेजारून एक पाण्याचा कॅनॉल भरून वहात होता. ''परत जर घरी आलीस तर कॅनॉलमध्ये फेकून देईन!'' मी आपली गुपचूप आजीसोबत घाबरून निघून गेले. व परत काही हट्ट केला नाही. परंतु जेव्हा–केव्हा माझे आई–वडिल व भाऊ भेटायला यायचे किंवा मी सुट्टीवरून आजोळी परत यायचे तेव्हा मी खूप रडायचे.

पण अशावेळी मला आजी व माझी मोठी मावशी (ती आत्ता तिला मूल नसल्याने नवरा सांभाळत नसल्याने माझ्याकडेच आहे.) मला शांत करायची, नादवायची, फिरायला न्यायची. तिने माझी साथ कधीच सोडली नाही. असे करत सातवीपर्यंत शिकले. नंतर आठवीला मी गावी गेले.

गावापासून तीन कि.मी. अंतरावर माझी शाळा होती. मी त्या शाळेत जात होते. पण मी चांगलीच रागीट बनले होते. माझी व माझ्या दोन नंबरच्या भावाची कायम भांडणे होत असत. तेव्हा मात्र आई माझ्या भावंडांची तर वडिल मात्र माझी बाजू घेत असत.

परिस्थिती गरीब असल्याने पुन्हा मामाकडे राहून नोकरी करून माझे शिक्षण पूर्ण केले. परंतु पुन्हा पैशाअभावी कायदा–शिक्षण काही पूर्ण करता आले नाही. माझे लग्न झाले. लग्न हे माझ्या मैत्रिणीच्याच भावाशी झाले. ठरवूनच झाले. परंतु नवरा व घरातील सर्वजण खूप चांगले असल्याने प्रेम व आधार खूप चांगला मिळाला. त्यामुळे मी उभी राहिले. सकारात्मक विचार करू लागले.

मग मात्र मला वाटू लागले की मी शिकावे म्हणूनच की काय मला वडिलांनी आजोळी ठेवले. संपूर्ण शिक्षण घेताना, मागे वळून पहाताना मला कधीही ही गोष्ट आठवली नाही. परंतु आईकडे असताना व नंतरही नेहमी मला स्वप्न पडायचे की मी कॅनॉलमध्ये वाहून चालले आहे. पण मला कधीही आठवण झाली नाही की मला माझे वडिल असे म्हणाले होते.

माझी आई दोन वर्षांपूर्वी वारली. कमालीची पोकळी जाणवू लागली होती.

मी खूप रडत असायचे. रोज ती माझ्या स्वप्नात यायची. तेव्हा मला जाणवले की माझा खरेच आईवर एवढा जीव होता का? मी विचार करू लागले तर उत्तर हो असेच येई. परंतु आईचे व माझे खूप मतभेद होत. मी आईवर खूप नाराज होते. कारण आई–वडिल दोघांनीही कधीही, कसलाही सपोर्ट मला केला नाही. परिस्थिती सुधारल्यानंतरसुद्धा.

पण तरीही जेव्हा आलोचनाचे ट्रेनिंग होते तेव्हा असे सांगितले की लहानपणाची कोणती अशी गोष्ट आहे की जिच्यामुळे तुम्हाला दु:ख होते. तर तेव्हा मला एकदम कधीही विचार न केलेला हा प्रसंग आठवला आणि मी खूप रडू लागले. पहिल्यांदा या प्रसंगाने मला जोरजोरात रडावे असे वाटत होते.

पहिल्यांदा ही वेदना अशी बाहेर पडली. वयाच्या ४१व्या वर्षी! तोपर्यंत या दु:खाचे परिणाम माझ्यावर काय–काय झाले?

आई–वडिलांच्या असणाऱ्या अपेक्षा किती होत्या? आजही माझ्या डोळ्यांत पाणी येते.
परंतु मी मात्र माझ्या मुलांच्या बाबतीत असे होऊ नये म्हणून माझ्या प्रत्येक वागण्यामागे माझा काय हेतू आहे हे समजावून सांगत असते.
मला माझ्या मानसिक असंतुलनामधून मैत्रीण प्रभा तसेच माझ्या सासुबाई (आई म्हणून प्रेम करणाऱ्या), माझ्या दोन्ही नणंदा (संगीताताई, साधनाताई) या सर्वांनीच खूप–खूप मदत केली. तसेच माझा नवरा शशिकांत या सर्वांनी मला खूप प्रेमाने वागविले आणि असे असूनही, माझ्या मनाचा एक कोपरा मात्र माझ्या माहेरच्यांसाठी दुःखीच आहे.

**कांचन आगळे**
वर्क फॉर इक्वॅलिटी,
तळेगाव दाभाडे

# पाळी मिळी गुपचिळी

आलोचनाच्या मिटींगमध्ये 'पाळी–मिळी गुपचिळी' हा डॉ. शंतनू अभ्यंकर यांचा लेख आम्ही वाचला. त्यावर झालेल्या चर्चेतून मासिक पाळीविषयी असणारे समज–गैरसमज पुढे आले. या चर्चेतूनच मला कल्पना सुचली की हा लेख कम्युनिटी मिटिंगमध्ये महिलांच्या बरोबर वाचायचा. ह्या विषयावर चर्चा करायची. त्याप्रमाणे आम्ही हा लेख वाचला. या चर्चेमध्ये प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या गोष्टी ऐकायला मिळाल्या. प्रत्येक ठिकाणचा अनुभवही वेगवेगळा होता.

मासिक पाळीवर चर्चा करायची म्हटल्यावर सुरुवातीला महिला काहीच प्रतिसाद देत नव्हत्या. त्या यावर बोलायला लाजत होत्या. त्यांना खेळाच्या माध्यमातून मोकळे केल्यावर मात्र आमच्या चर्चा रंगत गेल्या. या चर्चेतून महिलांकडून खूप प्रश्न पुढे आले. मुळातच मासिक पाळी कशी व कशामुळे येते याची शास्त्रीय माहिती महिलांना नव्हती.

हळूहळू महिला ग्रुपमध्ये बोलू लागल्या. मग मी थोडा विषय बदल करून मासिक पाळी मागे–पुढे ढकलण्याच्या गोळ्यांविषयीही बोलायला सुरुवात केली. तर यातून माझ्या निदर्शनास असं आलं की ग्रुपमध्ये असणाऱ्या २०–२५ महिलांपैकी १०–१२ महिलांनी पाळी पुढे ढकलण्याची गोळी कधी न कधी घेतलेली होती. याचं मुख्य कारण सणवार हेच होतं. मुळातच 'पाळी म्हणजे अपवित्र' याची जोडी त्यांनी लावलेली होती.

एके ठिकाणी तर सासू–सून एकत्र सहभागी झाल्या होत्या व सत्र संपल्यानंतर सासूबाई माझ्याकडे आली व मला म्हणाली ''माझी सून तर कायम असली गोळी खाते, मॅडम तुम्हाला स्वामींनीच धाडलयं तिला समजवायला'' यावर तिला मी फक्त हसून प्रतिक्रिया दिली.

आता ह्या महिला आपले अनुभव सांगू लागल्या आहेत. पाळी पुढे ढकलण्याच्या गोळ्या घेतल्यावर होणाऱ्या शारीरिक त्रासाविषयीही त्या ग्रुपमध्ये बोलतात. त्याचा परिणाम म्हणजे इतर महिला या गोष्टीकडे डोळसपणे पहायला लागल्या आहेत.

ग्रामीण भागांमध्ये अजूनही वयात आलेल्या मुली, स्त्रिया यांना पाळी आल्यावर बाजूला बसवलं जातं. अशीच एक तरूण मुलगी मला म्हणाली, ''मॅडम, सणवार असेल तर आम्ही गोळ्या घेऊन पाळी पुढं ढकलतो. कारण नाहीतर त्या काळात कंपलसरी बाजूला बसावं लागतं. असं बाजूला बसण्यापेक्षा गोळ्यांमुळे होणारा त्रास परवडला.''

आता निदान याबद्दल किमान बोलायला तरी सुरुवात झालेली आहे.

**शीतल जाधव**
दिशा, तळेगाव दाभाडे.

# जीवन कौशल्य कार्यशाळा

रेनबो होम्स ही वंचित मुलांसाठीची निवासी संस्था आहे. भारतात अनेक ठिकाणी ही होम्स आहेत. तळेगावमधील 'वर्क फॉर इक्वॅलिटी' ही संस्था मुलींसाठी प्रेरणा रेनबो होम्स चालवते. रेनबो होम्समधल्या मुलामुलींसाठी एक निवासी शिबिर निळशी येथे वायएमसीएच्या ट्रेनिंग सेंटरमध्ये आयोजित करण्यात आले होते. मीही आमच्या मुलींना घेऊन गेले होते.

निळशीला आम्ही पोहचलो तेव्हा थोडा–थोडा पाऊस पडत होता. वातावरण खूपच छान होतं. आजूबाजूला सुंदर, हिरवेगार डोंगर होते.

मुंबईच्या सुमित्राताई आष्टीकर यांनी हे शिबिर घेतलं.

- त्यांनी प्रत्येक सेशनची सुरुवात गाण्यानं केली.
- मुलांचे चार गट केले व प्रत्येक गटाला होम मध्ये कसं रहावं. याविषयी नियम करण्यास सांगितले व ते वाचून दाखविण्यास सांगितले.
- माणसासाठी नियम का असावेत, नाहीतर काय होईल याबद्दलची चर्चा तर चांगलीच रंगली.
- मुलांनी, ताईंनी दिलेल्या विषयावर सुंदर नाटकं बसविली, आमचा विषय होता – 'आपली मैत्रीण नाराज दिसत असेल किंवा आजारी असेल तर तिला कशाप्रकारे आनंदी करणार?'
- 'चांगला स्पर्श, वाईट स्पर्श' याबद्दल फिल्म आणि चित्र यांच्या साहाय्याने माहिती दिली.

त्याचबरोबर वयात येणे म्हणजे काय, वयात येताना शरीर–मनामध्ये होणारे बदल याविषयी माहिती दिली. या वयात मुलांविषयी वाटणारं आकर्षण, प्रेम याविषयी खूप छान पद्धतीनं उदाहरणं देऊन समजावून सांगितलं. तसेच अशा प्रेमातून होणारे शारीरिक व सामाजिक परिणाम याचीही जाणीव करून दिली.

शेवटचे सत्र, 'ध्येय कसे ठरवायचे' यावर होते. आपलं ध्येय काय किंवा आपल्याला काय करायला आवडतं हेच मुळात समजत नाही. त्यांनी घेतलेल्या खेळातून ध्येय समजण्यास खूप चांगली मदत होऊ शकते.

या ट्रेनिंगमध्ये मुली व मुले पुढे येऊन बोलली, त्यांनी प्रश्न विचारले व प्रत्येक उपक्रमामध्ये स्वत:हून सहभागी झाली.

**कल्पना आगळे,**
वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव दाभाडे

# गुन्हा कुनाचा? आन दंड कुनाला?

मम्मे,
बोलू की, नगं बोलू?
त्या दुश्मनानं भर दिसा, सोताच्या लेकीला, माज्या मैतरनीला फुडं पाटवलं
आन मला श्येतात निऊनशान......
तवा आजीनं मला घरात गाडलं
आन फुडच्या दारानं वट्यात पैशे घेतलं आन तोंडाला टाळं लावलं
म्या त्वांड उगाडलं तर डोळं वटारलं.
आन आता म्या सासरी चालले, तर कशाला, उगा गळा काढतीय
म्या तर तवाच म्येले, जवा आजीनं त्या हैवानाकडनं पैशे उचललं
आन पोलिस चौकीत कम्पलीट करू दिली न्हाय.

त्या सरपंचाकडनं झालीत[1] कपाट घिशील, तर खबरदार !
आन
त्यो पोलिस पाटील, तुज्या चुलत्याचा ल्योक
तेच्याकडं गडगनेरला[2] म्या अजाबात जायची न्हाय
त्येनंच तर ह्यो डाव रचला
माजी साळा बंद क्येली.

माजी ती मैतरीण, त्या मुडद्याची लेक मास्तरीण झाली
आन मला मातुर, सातवीत घरी बशीवलं
मम्मे, गुन्हा कुनाचा, आन दंड कुनाला?

**मेधा टेंगशे**
साधना व्हिलेज, चिखलगाव

१. झाल = रूखवत
२. गडगनेर = केळवण

# बालमेळावा

१४ नोव्हेंबर, बालदिनानिमित्ताने बालमेळावा घ्यायचे नक्की केले. आणि आम्ही तयारीला लागलो. यामध्ये आम्ही पाच गावांतील मुला–मुलींचा समावेश करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे आम्ही सर्वांनी त्याची तयारी केली.

बालमेळावा हा वाडिवळे गावात करण्याचे ठरविले. या बालमेळाव्यात नेसावे, बुधवडी, वळक, मुंढावरे व वाडिवळे या गावातील मुले–मुली येणार होती. त्यासाठी आम्ही मुला–मुलींना येणे व जाण्यासाठी गाडीची सोय केली. १४ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. नियोजनाप्रमाणे सर्व लिंक वर्कर्स मुला–मुलींना घेऊन ठीक ११.०० वाजता आल्या.

मेळाव्याला सुरुवात झाली, यासाठी श्रीकांतदादा, वंदनाताई, स्नेहलताई पुण्याहून आले होते.

बालमेळावा हा मुलांसाठी आनंदाचा दिवस. यामध्ये प्रतिस्पर्धा नाही, तणावपूर्ण वातावरण नाही. यामध्ये मुलांना कोणाचे अनुशासन नाही. त्यामुळे मुले मनापासून आनंद घेत होती.

श्रीकांतदादांनी दिवसभर खूप वेगवेगळे उपक्रम, खेळ घेतले.

त्यामध्ये पायाच्या टाचा वर खाली करणे ही ॲक्टिविटी घेतली. ह्यामध्ये मुले आधी शाळेमध्ये जसे सावधान विश्राम या अवस्थेत असतात तशी उभी राहिली होती. या ॲक्टिविटीमुळे मुले आरामात उभे राहून खेळ खेळायला लागली. ती एकदम मोकळी झाली.

त्यानंतर 'ओ माय चेचे' हे गाणे घेतले त्यामुळे मुले अजून मोकळेपणानी गाण्यामध्ये सहभागी होऊ लागली.

त्यानंतर मुलांना आजूबाजूला पडलेल्या वस्तू गोळा करून निसर्गचित्र बनवण्यास सांगितले. यामध्ये मुलांनी खडे, माती, चपला व पालापाचोळा, काटक्या यांपासून निसर्गचित्र तयार करण्याचा प्रयत्न केला. हे करण्यासाठी मुलांचे गट तयार केलेले होते.

त्यानंतर आठवडा बाजार उभा करायचा होता. यामध्ये मुलींनी स्वत:च्या बांगड्या, गळ्यातल्या, कानातल्या व पायातल्या वस्तू काढून एक छान दुकान/बाजार भरवला होता. तर मुलांनी चप्पल, बुट, कपडे अशा प्रकारची दुकाने तयार केली होती.

त्यानंतर वर्तमानपत्रापासून पुतळा बनविणे हा उपक्रम






घेण्यात आला. सर्वांनी तयारी जोरात केली होती. सर्वजण पुतळे तयार करण्यात मग्न होते. यामध्ये मुलींचा गट हा पूर्ण शांत व मन लावून सर्व काम करत होता. मुलांचा पुतळा वेळ संपली तरी तयार नव्हता.

यामध्ये एका ग्रुपने महाराणी असा पुतळा तयार करून त्याला सजवले. महाराणी जे जे अलंकार परिधान करते ते सर्व मुलींनी कागदाचे बनविले होते. त्यांचा पुतळा छान दिसत होता. मुलींच्या दुसऱ्या गटाने बनवलेली गौराई देखील छान झाली होती.

यामध्ये मुलांनी अनेक कल्पना केल्या. पहिले ठरविले रावण तयार करायचा, रावणाची अर्धी तयारी झाल्यावर काही मुले बोलली. ''रावण नको, आपण आदिवासी माणूस बनवू'', नंतर त्यांनी आदिवासी मानव बनवला. त्यांनी त्या पुतळ्याला उघडा करून फक्त एक पेपर गुंडाळला. त्यांनी 'शॉर्टकट' निवडला. मुलांच्या दुसऱ्या गटाने मात्र कृष्ण बनवला होता.

यामध्ये मला असे दिसले की ज्यावेळी मुलांना मोठा गोल करायला सांगितला, तेव्हा अर्धा गोल मुलींचा व अर्धा मुलांचा होता. यामध्ये जसे मुलांना शाळेत एका बाजूला मुलांना व मुलींना बसवले जाते. त्याचा प्रभाव यामध्ये दिसून आला. याचाच अर्थ असा की, ही गोष्ट मुलांमध्ये लहानपणापासूनच रुजवली जाते. व ती मोठी झाल्यावर तसेच वागतात हे दिसून येते. हे लक्षात आल्यावर आम्ही दोन मुलींमध्ये एक मुलगा असे गोल करण्यास सांगितले व त्या पद्धतीनेच मुलांमध्ये कार्यक्रम घेण्यास सुरुवात केली.

दिवाळीत किल्ला बनवण्याची स्पर्धा आम्ही घेतली होती. त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. खाऊ खाऊन कार्यक्रम संपला.

**प्रविण भोईरकर**,
दिशा, तळेगाव दाभाडे.

**संपादक** : वंदना कुलकर्णी

**कार्यालयीन साहाय्य** : सुवर्णा जाधव, तनजिम खानजादे

**प्रकाशक** : आलोचना, ५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला, अशोक पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४.
फोन : ०२०-२५४४४१२२

**मांडणी** : यदिश ग्राफिक्स, पुणे ३०. **मुद्रक** : मुद्रा, पुणे ३०

**संवादिनी टीम** : वंदना कुलकर्णी, स्नेहल ठक्कर

**संवादिनी प्रकल्पातील सहभागी संस्था** : साधना व्हिलेज, मुळशी; दिशा, तळेगाव दाभाडे; रचना, पानशेत; वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव दाभाडे; ऊर्मी, हिंजेवडी; आदिम संस्कृती, फलोदे; अनुभूती फाऊंडेशन, पौड.

फक्त खासगी वितरणासाठी; या अंकातील विचारांशी आलोचना सहमत असेलच असे नाही.